24-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/23/2025 10:53 PM Page 1



## निवडक

### जेसीनगर फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २३ : जेसीनगर फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत जेसीनगर आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे वागुळे डीटीसी कुडतरी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २५ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत वागुळे आणि गोगळी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### कार्बन फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : कार्बन फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत रायतोळे आणि विराभाट नवीन ट्रान्सफॉर्मर भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.
त्याचप्रमाणे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स टीसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवारी दि. २५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागामस्जिद आणि सभोवतालच्या भागात वीजपूरवठा केला जाणार नाही.

### मुरीदा फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : ११ केव्ही मुरीदा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २४ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत मुरीदा, भीमसा, दांडोरा, बस स्टँड (केटीसी), नैने आणि आदिबंद भागात वीजपूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही चिंचिणी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत काकणामोड्डी, आकर रेसिडेन्सी, भाटिया आणि सावरकोट्टोच्या भागात वीजपूरवठा केला जाणार नाही. तसेच ११ केव्ही बेतुल फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत पोस्टावाडो, कुन्नी, ओएनजीसी, खानगुइनी, नाकेरी, टेंबी, बॉक्साईट तळप, नुवे, पिरवा, पिरवाडो, पिरवाडो, पिरवाडो, कुन्नी, ओएनजीसी, खानागुनी, नाकेरी, तेंबी, बॉक्साईट तळप, नुवें, पिरवाडो, गवळीवाडो, बेतुल, मुशेर, सीगल, जुवें भाट, जुवें बांध, बाप्सोरा, रंगाळी, खैरात आणि मैफेअर हॉटेल
भागात वीजपूरवठा केला जाणार नाही.

### मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : महसूल सचिव आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष संदीप जॅकीस, आयएएस यांनी पर्वरीतील सचिवालयात सरकारी खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उष्णतेच्या लाटांचा आणि मान्सूनपूर्व तयारीच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. जॅकीस आयएएस यांनी येणाऱ्या मान्सून हंगामामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही आपत्तकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी संबंधित यंत्रणानी सक्रिय असण्याची आणि आपत्तीच्या काळात जीव तसेच मालमत्ता वाचविण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन तयार ठेवण्याची गरज व्यक्त केली. उष्णतेच्या लाटेची तयारी आणि शमन उपायांशी संबंधित चर्चा झालेल्या मुद्द्यांमध्ये उष्णतेच्या लाटेबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी जागरूकता मोहिमा, रुग्णालयांसारख्या महत्त्वाच्या सुविधांना वीजपुरवठा सुरळीत ठेवणे, आवश्यक औषधांचा साठा ठेवणे, उन्हाळ्यात कालव्यांमध्ये पाणी सोडणे, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि पोर्टेबल पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जंगलातील आगींवर प्रतिबंधात्मक उपाय, राखीव/संरक्षित जंगले, उद्याने आणि अभयारण्यांमध्ये प्राण्यांसाठी पाण्याची उपलब्धता आणि सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाणी उपलब्ध करणे आणि वृद्धाश्रम आणि अनाथाश्रमांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी उष्णतेच्या लाटेच्या तयारीकडे लक्ष देणे आणि अपंग व्यक्तींची योग्य काळजी घेण्यासाठी विशेष व्यवस्था करणे अशा विषयांवर भर देण्यात आला.
बैठकीत पावसाळ्याच्या तयारीबद्दल चर्चा करण्यात आली ज्यामध्ये महामार्गांवरील झाडांची छाटणी, धोकादायक झाडे तोडणे, नाल्यांमधून गाळ काढणे, मूलभूत जीवनावश्यक वस्तूंचा साठा करणे, सोडलेल्या खाणींची ओळख पटवणे, बुडण्याच्या घटना टाळण्यासाठी सुरक्षा उपाययोजना, कमकुवत विद्युत खांबांचा शोध घेणे आणि नवीन बसविणे, पूर आणि भूस्खलन होण्याची शक्यता असलेल्या क्षेत्रांची ओळख पटविणे आणि आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत स्थलांतर योजना यावर श्री जॅकीस यांनी भर दिला. उत्तर आणि दक्षिण जिल्ह्यांमध्ये पुरेशा पायाभूत सुविधांनी सुसज्ज नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जॅकीस यांनी संभाव्य आपत्तीपूर्वी अलर्ट देणारे डउक्ए्ढ मोबाईल ॲप स्थापित करण्याचीही सुचना दिली. बैठकीत नियंत्रण कक्षाचे कामकाज, पूर येण्याचे,आपत्तीच्यावेळी स्थलांतर योजना आणि स्मार्ट सीटीच्या कामाविषयी चर्चा करण्यात आली. महसूल खात्याचे संयुक्त सचिव सुरेंद्र नाईक यांनी उपस्थितांचे स्वागत केले. महसूल खात्याचे अवर सचिव संदीप गावडे यांनी हवामानाशी संबंधित आव्हाने कमी करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांबद्दल सादरीकरण केले.

### करमळी फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : ११ केव्ही करमळी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सेंट्रल गव्हर्नमेंट कॉलनी १, सेंट्रल गव्हर्नमेंट कॉलनी २ ते शारदा मंदिर स्कूल, आर. पी. शिवा, प्रेस्कॉन होम्स, हेल्थवे (एचटी), गोल्ड कोस्ट, एला क्रस्ट, सुरेश परुळेकर, वेंकदरी, अडवलपालकर, मॉरिस गॅरेज आणि करमळी गावाच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### राष्ट्रीय सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग पुरस्कार २०२४ साठी अर्ज मागविले

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : भारत सरकारच्या सुक्ष्म, लघू आणि मध्यम उध्योग मंत्रालयाने राष्ट्रीय एमएसएमई पुरस्कार २०२४ साठी अर्ज मागविले आहेत. गोवा सरकारच्या उध्योग, व्यापार आणि वाणिज्य संचालनालयाखाली कार्यरत असलेल्या सुक्ष्म आणि लघु उध्योगांनी या पुरस्कारासाठी अर्ज करण्याची विनंती केली आहे. राज्यात सुक्ष्म आणि लहान उध्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी हे पुरस्कार देण्यात येतात.
उत्पादन उध्योग, सेवा उध्योग, महिला, एससी, एसटी, दिव्यांग उध्योजक अशा गटांत पुरस्कार देण्यात येतात. सुक्ष्म, लघू आणि मध्यम उध्योगाला ग्राह्य उध्यम नोंदणी असावी. पुरस्कार विजेत्यांना राष्ट्रीय प्रमाणपत्र आणि १ लाख ते ३ लाख रूपयांपर्यंत रोख बक्षिसे, मोठ्या उध्योगांकडे व्यवहार करण्याची संधी मिळेल. अधिक माहितीसाठी
https://dashboard.msme.gov.in/na/EntšNš-dmin/EntšNšEnt.aspx da भेट द्यावी. गोवा राज्यातील सुक्ष्म, लघू आणि मध्यम उध्योग या महत्वाच्या पुरस्कारासाठी अर्ज करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. कोणतीही समस्या असल्यास एमएसएमई, विभागिय कचेरी, भारत सरकार, कोंकण रेल्वेसमोर, मडगांव गोवा ४०३६०१, दूरध्वनी क्र. ०८३२-२७०५०९३/९४, ईमेल आयडी वलवळ-सेरवलीाश.सीं.ळप येथे संपर्क साधावा.

# योगेश शेटकरची चौकशी सुरू

## १८ लाखांच्या गैरव्यवहाराचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २३** : मडगाव मधील प्रसिद्ध फेस्तादरम्यान संकलित झालेला महसूल महापालिकेच्या तिजोरीत न जमा झाल्याच्या प्रकरणी जवळपास वर्षभरानंतर मडगाव नगर परिषद (एमएमसी) प्रशासनाने निलंबित कर्मचारी योगेश शेटकर यांच्याविरोधात अंतर्गत चौकशी प्रक्रिया सुरू केली आहे. शेटकर यांच्यावर सुमारे १८ लाख रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

मंगळवारी शेटकर यांनी महापालिकेचे अभियंता दीपक देसाई यांच्या समोर चौकशीदरम्यान आपले म्हणणे मांडले. ही चौकशी प्रक्रिया नागरी सेवा नियमांनुसार प्राथमिक स्वरूपाची असून, तिचा उद्देश पुढील शिस्तभंग कारवाईचा मार्ग मोकळा करणे आहे, असे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सद्य:स्थितीतील चौकशी ही शिस्तभंगात्मक विभागीय प्रक्रिया आहे आणि ती निधी वसुलीशी थेट संबंधित नाही. कथित गहाळ रकमेच्या वसुलीसाठी स्वतंत्र कायदेशीर अथवा प्रशासकीय पातळीवरील कारवाई करावी लागेल. गेल्या डिसेंबरमध्ये मडगाव पोलिसांनी शेटकर यांना अटक केली होती. त्यानंतर त्यांना जामिनावर सोडण्यात आले. तथापि, १८ लाख रुपयांच्या संपूर्ण गैरव्यवहारासाठी शेटकर यांच्यावरच पूर्ण जबाबदारी आहे का, यासंबंधी अद्याप अनिश्चितता आहे. उपलब्ध माहितीनुसार, त्यांनी विक्रेत्यांकडून केवळ तीन लाख रुपये वैयक्तिक पातळीवर वसूल केल्याचे मानले जात आहे.

या प्रकरणामुळे नगर परिषदेच्या महसूल संकलन व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. मेळाव्याचा महसूल कधीही अधिकृतरीत्या नगर परिषदेच्या तिजोरीत जमा झाला नसल्याने, महापालिकेवर आता आर्थिक पारदर्शकतेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जवळपास वर्ष होत आले असतानाही, गहाळ निधीच्या वसुलीबाबत महापालिकेची भूमिका अस्पष्ट आहे. नगराध्यक्ष दामू शिरोडकर यांनी यापूर्वी गहाळ रक्कम वसूल करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे जाहीर आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात अद्याप ठोस कृती झाल्याचे दिसून आलेले नाही. शिरोडकर यांनी यावेळी प्रशासनातील जबाबदारी, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि विविध विभागांमधील समन्वयावर भर देत, कार्यक्षम यंत्रणा उभी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. दरम्यान, चौकशी प्रक्रियेची तीव्रता वाढत असताना, एमएमसीवर आता केवळ अंतर्गत चौकशी पूर्ण करण्याचेच नव्हे, तर गहाळ निधी वसूल करण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा सार्वजनिक आणि राजकीय दबावही वाढत आहे.

# पे-पार्किंग अटेंडंटचा वाहनचालकास चावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३ :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या चर्च चौकात मंगळवारी एक अजब घटना घडली. पणजी महापालिकेच्या अंतर्गत कार्यरत एका पे-पार्किंग अटेंडंटने एका वाहनचालकास चावा घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार चर्च चौकात घडला असून, संबंधित अटेंडंट आणि वाहनचालक यांच्यात पार्किंग शुल्कावरून वाद झाला होता.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, पार्किंगसाठी लावलेल्या वाहनावर बसलेल्या एका व्यक्तीस अटेंडंटने हटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर झालेल्या वादाचे पर्यवसान अटेंडंटकडून ड्रायव्हरला चावा घेण्यात झाले. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. पीडित वाहनचालकाने याप्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर पणजी पोलिसांनी गुन्हा नोंदवून चौकशी सुरू केली आहे. संबंधित ड्रायव्हरची वैद्यकीय तपासणी जीएमसी मध्ये करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सदर वाहन ही गोवा सिव्हिल सर्व्हिसेसमधील वरिष्ठ अधिकारी अँथनी डिसोझा यांच्या पत्नी लुसिया डिसोझा यांच्या मालकीची असल्याचे समजते. त्या वैयक्तिक कामासाठी चर्च चौकातील युनियन बँकेत (पूर्वीची कॉर्पोरेशन बँक) गेल्या असताना ही घटना घडली.

तक्रारीनुसार, वाहनचालकाने अटेंडंटला सांगितले की त्यांच्या 'मॅडम' बँकेतून परतल्यानंतर शुल्क अदा केले जाईल. मात्र, अटेंडंटने तात्काळ शुल्क भरण्याचा आग्रह धरत वातावरण तणावपूर्ण केले आणि वाद विकोपाला गेल्यानंतर त्याने अनपेक्षितपणे चावा घेतला.

या अपप्रवृत्तीमुळे धक्का बसलेल्या लुसिया डिसोझा यांनी अटेंडंटच्या असभ्य वर्तनाविरोधात नाराजी व्यक्त केली असून, संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# कुर्टी -खांडेपार पंचायतीत दोन वर्षांत पाच सरपंच

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २३** : फोंडा तालुक्यातील कुर्टी – खांडेपार ग्रामपंचायतीमध्ये २०२२ च्या पंचायत निवडणुकीनंतर सरपंचपदाच्या जागेवर सतत बदल पाहायला मिळत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नीळकंठ नाईक यांची पंचायतीच्या सरपंचपदी निवड झाली असून, हे त्या कार्यकाळातील पाचवे सरपंच आहेत.

ग्रामपंचायतीचे एकूण ११ सदस्य असून, सरपंचपदासाठी स्थानिक राजकीय दबाव आणि अंतर्गत गटबाजीमुळे वारंवार बदल होत असल्याचे चित्र आहे. या पंचायतीमध्ये मागील कार्यकाळातही सरपंचपदाच्या जागी आठ वेळा बदल झाला होता.

ऑगस्ट २०२२ मध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीनंतर नावेद तहसीलदार यांची पहिल्या सरपंच म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी ऑगस्ट २०२२ ते मे २०२३ या कालावधीत सरपंचपद सांभाळले. त्यानंतर संजना नाईक मे २०२३ ते डिसेंबर २०२३ या काळात सरपंच होत्या. हरेश नाईक जानेवारी २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत तिसरे सरपंच म्हणून कार्यरत होते, तर अभिजीत गावडे यांनी ऑक्टोबर २०२४ ते १३ मार्च २०२५ या कालावधीत चौथे सरपंच म्हणून जबाबदारी सांभाळली.

१३ मार्च २०२५ नंतर सरपंचपद तब्बल एक महिना सात दिवस रिक्त राहिले. यामागील कारण म्हणजे बीडीओ कार्यालयाने पंच सदस्य बीका केरकर यांना अपात्र ठरवले होते, ज्याविरोधात केरकर यांनी न्यायालयात धाव घेतली. सत्र न्यायालयाने बीडीओचा निर्णय रद्द करून केरकर यांना निवडणुकीत सहभागी होण्याची परवानगी दिली. या न्यायालयीन प्रक्रियेमुळे सरपंचपदाच्या निवडणुकीला विलंब झाला. शेवटी, २१ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या निवडणुकीत निळकंठ नाईक यांची सरपंचपदी निवड झाली. यामुळे सध्याच्या कार्यकाळात कुर्टी -खांडेपार ग्रामपंचायतीला दोन वर्षांत पाचवे सरपंच मिळाले आहेत, ही बाब स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थैर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

# सावर्डे-मोले मार्गालगत बेकायदेशीर क्रशर ?

## मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड, जमीन भरण्याचे काम सुरू

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३ :** सरकारकडून टेकड्यांची तोड किंवा वृक्षतोडीला परवानगी दिली जाणार नाही, असे जाहीर वक्तव्य वारंवार करण्यात येते. मात्र प्रत्यक्षात सावर्डे ते मोले आणि धारबांदोडा मुख्य रस्त्यालगतच्या सर्वे क्रमांक ८/१ या जमिनीवर बेकायदेशीरपणे दगड क्रशर उभारण्यात आला असून, मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड तसेच जमीन भरण्याचे काम सुरू आहे.

विशेष म्हणजे, हे काम केवळ स्थानिक पंचायतीकडून दिलेल्या तात्पुरत्या परवानगीच्या आधारे सुरू करण्यात आले आहे. अशी परवानगी अशा प्रकारच्या प्रकल्पांना कायदेशीर मान्यता देऊ शकत नाही. अधिक चिंतेची बाब म्हणजे, हा क्रशर थेट नाल्यावर उभारण्यात आला आहे, जो दरवर्षी पावसाळ्यात पूरग्रस्त होतो.

स्थानिक रहिवासी स्वप्नील भंडारी यांनी सांगितले की, शेतातील साफसफाईचे काम सुरू असताना आम्ही याला आक्षेप घेतला होता. मात्र तरीही मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली गेली. इतक्या वृक्षतोडीला अधिकृत परवानगी कोणी दिली, हा गंभीर प्रश्न आहे. पंचायतीच्या निर्णयावर उच्च पातळीवरून दबाव टाकण्यात आल्याची शंका यावरून बळावते.

ते पुढे म्हणाले, गेल्या ग्रामसभेत आम्ही या प्रकरणावर चर्चा करत सरपंचांना येथे कोणत्याही नव्या प्रकल्पाला परवानगी देऊ नये, अशी विनंती केली होती. परिसरात आधीच दोन औद्योगिक युनिट्समुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रस्त्यापासून १५ मीटर अंतराच्या आत कोणत्याही प्रकारचा प्रकल्प उभारता येत नाही. मात्र, येथे रस्त्यालगतच काम सुरू आहे, जे न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन आहे. या प्रकल्पासाठी दिलेली तात्पुरती परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी. पंचायत आणि संबंधित प्रशासनाने या प्रकरणात त्वरित कारवाई करावी, अशी मागणीही भंडारी यांनी केली.

# बेकायदेशीर मासेमारीला आळा घालण्यासाठी ड्रोनचा वापर सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३ :** गोवा मत्स्यव्यवसाय विभागाने बेकायदेशीर मासेमारीच्या नियंत्रणासाठी ड्रोन पायलट प्रकल्प सुरू केला आहे, ज्यात एलईडी लाईटच्या वापरामुळे होणाऱ्या वादग्रस्त मासेमारीचा समावेश आहे. पर्वरी येथे पत्रकारांशी संवाद साधताना मत्स्यव्यवसाय मंत्री नीलकंठ हळर्णकर यांनी सांगितले की, ड्रोन तंत्रज्ञानामुळे अधिकाऱ्यांना उल्लंघनांची अधिक कार्यक्षम आणि रिअल-टाइम निरीक्षण क्षमता मिळणार आहे, विशेषत: अशा भागात जेथे नियमित गस्त घेणे कठीण ठरते.

गेल्या दहा दिवसांपासून ड्रोनच्या मदतीने पाळत ठेवली जात आहे. या ड्रोनमध्ये सुमारे दहा किलोमीटर परिसराचे निरीक्षण करण्याची क्षमता आहे, जे गोव्यातील समुद्राच्या १२ किलोमीटर क्षेत्रापर्यंत पोहोचते. कॅमेरे विशिष्ट बोटीवरील कर्मचाऱ्यांची माहिती टिपतात. या प्रकल्पाची सेवा दोन महिन्यांच्या कालावधीत जहाजावर पायलट प्रकल्प म्हणून सुरू करण्यात आली आहे, असे हळर्णकर यांनी स्पष्ट केले.

मंत्री पुढे म्हणाले की, आगामी मासेमारी हंगामात आम्ही पणजीतील कार्यालयात बसून बोटींचे निरीक्षण करू शकू. एलईडी लाईटचा वापर करून बेकायदेशीर मासेमारीच्या क्रियाकलापांची निरीक्षण करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त ठरेल. लवकरच निविदा जारी केली जाईल आणि ड्रोन सेवा एक वर्षासाठी सुरू केली जाईल. ड्रोन सेवेला पणजी कार्यालयातून चालवले जाईल.

गोव्यातील बेकायदेशीर मासेमारी ही एक मोठी समस्या बनली आहे, ज्यामध्ये विशेषतः बुल ट्रॉलिंग आणि एलईडी लाईट्ससारख्या विनाशकारी पद्धतींचा वापर केला जात आहे. या पद्धतींमुळे सागरी परिसंस्थेवर मोठा परिणाम होत असून पारंपारिक मासेमारी पद्धतींना हानी पोहोचत आहे. स्थानिक मच्छीमार एलईडी लाईटच्या वापरावर कडक बंदी आणि अधिक तपासणीची मागणी करत आहेत, कारण हे लाईट्स अल्पवयीन मासे आणि इतर सागरी जीवांची आकर्षण करतात आणि त्यांना जाळ्यात अडकवतात.

# मासळी बाजारातील सोपो निविदा प्रक्रियेला पुन्हा विलंब

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २३** : दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण (एसजीपीडीए)कडून मडगाव येथील घाऊक मासळी बाजारासाठी सोपो शुल्क संकलनाच्या निविदा प्रक्रियेला पुन्हा एकदा विलंब झाला असून, यामुळे बाजारातील अनियमित व्यवहार आणि बेकायदेशीर व्यवसाय वाढत असल्याची चिंता व्यापारी व स्थानिक मच्छीमारांनी व्यक्त केली आहे.

एसजीपीडीएचे अध्यक्ष कृष्णा ऊर्फ दाजी साळकर यांनी १५ एप्रिलपर्यंत निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले असतानाही, स्थानिक मच्छीमारांच्या मागण्यांचा सखोल अभ्यास करण्याच्या निर्णयामुळे प्राधिकरणाने ही प्रक्रिया पुढे ढकलली आहे. नुकत्याच पार पडलेल्या बोर्डाच्या बैठकीत, सदस्यांनी एकमताने निविदा स्थगित करण्याचा निर्णय घेतला असून, विशेषतः स्थानिक मच्छीमारांसाठी एकरकमी सवलतीच्या दराचा प्रस्ताव अभ्यासण्याचा निर्णय घेतला आहे.

प्राधिकरण आपली वचनबद्धता कायम ठेवत आहे. मात्र, स्थानिक मच्छीमारांनी मांडलेली एकरकमी विक्री दराची मागणी विचारपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. अभ्यास पूर्ण होईपर्यंत निविदा पुढे ढकलणे भाग आहे, असे अध्यक्ष साळकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, निविदा प्रक्रियेला प्रशासनिक कारणास्तव विलंब होत असल्याचे सांगितले जात असले, तरी बाजार संकुलाबाहेर अनधिकृत आणि अनियंत्रित व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असून, त्यावर कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही. या व्यवहारांमुळे अधिकृत विक्रेत्यांचे उत्पन्न कमी होत असून, परिसरातील स्वच्छता आणि महसूल यावरही विपरीत परिणाम होत आहे.

मडगाव येथील मासळी बाजार गेल्या अनेक वर्षांपासून सोपो शुल्क संकलन, विक्रेत्यांचे नियमन आणि मूलभूत सुविधांच्या व्यवस्थापनासंदर्भातील समस्यांनी ग्रस्त आहे. खाजगी कंत्राटदारामार्फत प्रवेश आणि वापर शुल्क वसूल करण्याची सोपो निविदा प्रक्रिया बाजारात शिस्त निर्माण करण्यात आणि प्राधिकरणासाठी स्थिर महसूल प्रवाह सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र, वेळोवेळी निविदा प्रक्रियेला होणाऱ्या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सद्यःस्थितीत झालेला विलंब ही आणखी एक चुकलेली अंतिम मुदत असून, यामुळे नियोजनातील दुर्लक्ष आणि निर्णय प्रक्रियेतील अकार्यक्षमता समोर आली आहे.

# माडेल-फातोर्डा येथे सीमांकनावरून तणाव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २३** : माडेल-फातोर्डा परिसरात पारंपरिक सार्वजनिक रस्त्याच्या सीमांकनावरून स्थानिक रहिवाशांनी बुधवारी तीव्र निषेध व्यक्त केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. शतकानुशतके स्थानिकांसाठी प्रवेश मार्ग म्हणून अस्तित्वात असलेल्या रस्त्याचा समावेश खाजगी गृहनिर्माण प्रकल्पाच्या मालमत्तेत करण्याच्या हालचालींवर त्यांनी आक्षेप नोंदवला आहे.

रहिवाशांचा आरोप आहे की, सदर सीमांकन खाजगी बांधकाम प्रकल्पाला सहाय्य करण्याच्या उद्देशाने केले जात असून, ही प्रक्रिया पूर्णतः अन्याय्य आणि पारदर्शकतेच्या विरोधात आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

बुधवारी संध्याकाळी स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी एकत्र येऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. हा रस्ता आमच्यासाठी केवळ वाहतुकीचा मार्ग नाही, तर तो आमच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाचा एक भाग आहे. तो अनेक दशकांपासून आमच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक आहे, असे स्थानिक रहिवासी मिलाग्रेस फर्नांडिस यांनी सांगितले.

फर्नांडिस यांनी असा सवाल उपस्थित केला की, तीन मीटरचा रस्ता अचानक बारा मीटरचा कसा होतो? आणि तो रस्ता जमीनधारकाच्या मूळ दस्तऐवजांमध्ये सार्वजनिक प्रवेशमार्ग म्हणून नमूद असताना, आता नव्याने उभारल्या जाणाऱ्या गृहनिर्माण संस्थेच्या मालकीत कसा गेला? 

रहिवाशांनी स्पष्टपणे सांगितले की, सीमांकनाची ही कारवाई स्थानिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता करण्यात आली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर पक्षपातीपणा आणि खाजगी हितसंबंधांना पाठिंबा देण्याचा आरोप केला.आम्ही औपचारिकरीत्या तक्रार दाखल करूनही सीमांकन थांबवले गेले नाही. ही कारवाई केवळ दुर्लक्षच नाही, तर आमच्या हक्कांवर अतिक्रमण आहे,असे फर्नांडिस यांनी पत्रकारांशी बोलताना नमूद केले.

रहिवाशांनी स्पष्ट इशारा दिला की, जर त्यांचे म्हणणे लक्षात घेतले गेले नाही, तर ते अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडतील. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालून तात्काळ सीमांकन प्रक्रिया थांबवावी, अशी त्यांची जोरदार मागणी आहे. संपूर्ण घटनेमुळे परिसरात अस्वस्थता पसरली असून स्थानिक जनता प्रशासनाकडून पारदर्शकता, जबाबदारी आणि न्यायाच्या अपेक्षेने पुढे येत आहे. या वादामुळे भूमिगत साठवणूक, रस्त्याच्या कायदेशीर हक्क आणि समुदायाच्या हक्कांची नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

# मंत्री गावडेंविरोधात 'सुपारी आंदोलन'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३ :** कला राखोण मांडने मंगळवारी पुन्हा एकदा गोविंद गावडे यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी केली. कला अकादमीला योग्य रितीने सांभाळण्यात अपयशी ठरलेले मंत्री व आवाज उठवणाऱ्यांवर आरोप करणाऱ्यांची तीव्र निंदा करण्यात आली. कला अकादमीच्या सभेत बोलताना, कला राखोण मांडचे संयोजक देविदास आमोणकर यांनी मंत्री गोविंद गावडे यांच्या वक्तव्यांवर कडवट टीका केली. शरद पोंक्षे यांसारख्या मान्यवर कलाकारांचा अपमान करणाऱ्या या मंत्र्यांच्या विधानाचा आम्ही निषेध करतो. निंदनीय वादग्रस्त विधान केल्यानंतरही ते सर्व काही सुरळीत असल्याचे सांगण्याचे धाडस दाखवतात, असे आमोणकर म्हणाले.

कला अकादमी टास्क फोर्सचे सदस्य, फ्रान्सिस कोएल्हो यांनी या प्रकरणावर आपली चिंता व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी टास्क फोर्स स्थापनेसंबंधी निर्णय घेतला, परंतु त्याचा काही उपयोग झालेला नाही. आमची मागणी आहे की, 'कुणी श्रेष्ठ आहे, मंत्री की मुख्यमंत्री?' आम्ही कला अकादमीच्या तपासणीसाठी तज्ज्ञांचा अहवाल मागितला होता, परंतु तो आजपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळे मी मुख्यमंत्र्यांना आवाहन करतो की, जर ते या मुद्याचे योग्य रितीने निराकरण करण्यास असमर्थ असतील, तर त्यांनी राजीनामा द्यावा, असे ते म्हणाले.

ज्येष्ठ पत्रकार संदेश प्रभुदेसाई यांनी या आंदोलनाबद्दल भाष्य केले. आम्ही आमचे आंदोलन तिर्थक्षेत्र दिनी आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता, परंतु पोप फ्रान्सिस यांच्या निधनामुळे ते पुढे ढकलण्यात आले आहे.